चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२४ जुन,२०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7447744100 (PRO)

# माजरी पोलीस स्टेशन नवनिर्मित प्रशासकीय व निवासी इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न.

दि. २४ जुन २०२० रोजी चंद्रपुर जिल्हयातील आणखी एक नवनिर्मीत पोलीस स्टेशन माजरीच्या प्रशासकीय व निवासी इमारतीचा उद्घाटन सोहळा मा. ना. श्री. विजय वडेट्टीवार, मंत्री इतर मागास बहुजन कल्याण विभाग, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, चंद्रपुर जिल्हा यांचे शुभ हस्ते मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेड्डी व इतर मान्यवर यांचे उपस्थितीत सोशल डिस्टंसिंग चे पालन करून पार पडला.

नवनिर्मीत पोलीस स्टेशनची इमारत ही अत्याधुनिक सोई सुविधेने सुसज्ज असुन तेथील नवनिर्मीत निवासी इमारती सुध्दा तेवढयाच प्रशस्थ अशा आहेत. इमारीच्या परिसरात एक प्रशस्त मैदान सुध्दा तयार करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाचे उदघाटक तथा अध्यक्ष म्हणुन मा. ना. श्री. विजय वडेट्टीवार, मंत्री इतर मागास बहुजन कल्याण विभाग, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, चंद्रपुर जिल्हा हे असुन सदर कार्यक्रमात उद्घाटक म्हणुन मनोगत व्यक्त करतांना त्यांनी सांगीतले की, पोलीस स्टेशनच्या उरर्विरीत कामाकरीता लवकरात लवकर निधी मंजुर करून देवु आणि कोणत्याही कामात निधि कमी पडु देणार नाही असेही आवाहन केले. तसेच एका वर्षातच मुल पोलीस स्टेशनची सुध्दा एक प्रशस्थ इमारत तयार करू असे आवाहन उपस्थितांना केले.

कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणुन मा. श्री. संध्याताई गुरूनुले, अध्यक्ष, जिल्हा परिषद चंद्रपुर, मा. श्री. खा. सुरेश धानोकर, चंद्रपुर आर्णि लोकसभा क्षेत्र, मा. आ. सौ. प्रतिभाताई धानोरकर, वरोरा विधानसभा क्षेत्र, पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा श्री. डॉ. निलेश पांडे, ठाणेदार पोलीस स्टेशन माजरी श्री. सदाशिव ढाकणे, सर्व पोलीस निरिक्षक वरोरा उपविभाग, आणि श्री. संतोष जाधव, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. १ चंद्रपुर आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच कार्यक्रमात पोलीस स्टेशन इमारत तयार करण्यासाठी जागा देणारे माजी सरपंच गोलु कोरमय्या आणि आजी संरपंच श्रीमती शर्मिला आमटे यांचा सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्तावीक पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांनी केले असुन त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्येच पोलीस स्टेशन संदर्भात संपुर्ण माहिती दिली आणि पोलीस स्टेशन उरर्वित काम आपल्या पुढाकाराने लवकरच पुर्ण होईल असे उपस्थितांना आश्वासन दिले. कार्यक्रामाचे सुत्र संचलन सपोनि. श्री. सदाशिव ढाकणे व आभार प्रदर्शन उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा डॉ.श्री. निलेश पांडे यांनी केले असुन कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. निलेश पांडे यांचे मार्गदर्शनात सपोनि. श्री. सदाशिव ढाकणे व माजरी पोलीस स्टेशन कर्मचारी वृंद यांनी केले.

---